# University of Mumbai

अति महत्वाचे

दूरध्वनी क्र. : 022-2261 8987
022-227 08738
Email ID : supt.statunit@gmail.com

सांख्यिकी कक्ष,
फोर्ट, मुंबई— ४०० ०३२.

**No.UDSTAT/ICD/ MIS/2016-17/104 of 2016**

परिपत्रक:—

विषय :— व्यवस्थापकीय माहिती पद्धत (MIS) शैक्षणिक वर्ष २०१६—१७ ऑनलाईन माहिती भरणेबाबत. (www.dhemis.maharashtra.gov.in)

संदर्भ :— क्र. उशिसं/सांख्यिकी/एमआयएस/२०१६—१७/९३९७, दिनांक ८ ऑगस्ट, २०१६.

---

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरून सर्व कला, विज्ञान, वाणिज्य, शिक्षणशास्त्र व विधी महाविद्यालये/संस्था यांचे प्राचार्य/संचालक यांचे संबंधित परिपत्रकाकडे लक्ष वेधू इच्छितो की, राज्यातील उच्च शिक्षणाबाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी, त्याची अमलबजावणी करण्यासाठी व महाविद्यालये/संस्था यांचे सर्वेक्षणामध्ये समावेश होण्याच्या दृष्टीकोनात विचार करता अत्याआवश्यक असलेली Online माहिती त्यांनी दिलेल्या Web Portal नोंदविणे आवश्यक आहे.

शैक्षणिक वर्ष २०१६—१७ या वर्षाकरिता संचालनालयाकडून सुचीत केल्याप्रमाणे MIS -व्यवस्थापकीय माहिती पद्धत ही संचालक महाराष्ट्र शासन, उच्च शिक्षण विभाग, पुणे, निर्मित सर्वेक्षणाच्या कामकाजाबाबत आपणास विचारण्यात आलेली माहिती ही अत्यंत महत्वपुर्ण व शासनास पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी उपयुक्त असल्याने ती आपल्या मार्फत त्वरीत सादर करणे गरजेचे आहे.

MIS - व्यवस्थापकीय माहिती पद्धत :—

**शैक्षणिक वर्ष २०१६—१७ वर्षाकरीता संचालनालयाकडून विचारण्यात आलेल्या Online पद्धती नुसार प्रशासकीय, शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची माहिती आपल्या महाविद्यालयाकडून नोंदविण्यासाठी संबधित काम हे संचालनालयामार्फत शासनास सादर करण्याच्या हेतूने व कार्यालयीन कामाची योग्य ती कार्यवाही पुर्ण करण्याच्या हेतूने ती संचालनालयास त्वरीत सादर करणे आवश्यक आहे.**

MIS -व्यवस्थापकीय माहिती पद्धत या सर्वेक्षण कार्यक्रमाची रूपरेषाबाबत संचालक महाराष्ट्र शासन, उच्च शिक्षण विभाग, पुणे, यांनी दिलेल्या आदेशानुसार शैक्षणिक वर्ष २०१६—१७ या वर्षाकरीता MIS बाबतची Online माहिती www.dhemis.maharashra.gov.in या Web Portal वर उपलब्ध असलेल्या विवरण—पत्रामध्ये Online स्वरूपात भरावयाची आहे.

**उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता आपल्या असे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सर्वेक्षणाद्वारे शासनास उपलब्ध असलेली विविध शैक्षणिक बाबींची महत्वाची माहिती लक्षात घेता महाविद्यालये/संस्था यांनी ती Online पद्धतीने नोंदविणे अत्यंत आवश्यक आहे.**

**त्याबाबत आपले अधिकारी वर्ग/कर्मचारी वर्ग यांना आपल्या उच्चस्यरावरून सुचित करावे की, प्रति शैक्षणिक वर्षानुसार संचालनालयास महत्वपुर्ण असलेली माहिती Web Portal वर उपलब्ध असलेल्या विवरण—पत्रामध्ये Online स्वरूपात भरून महाविद्यालयातील प्राचार्य यांच्या शिक्का व सहीने परिपुर्ण असलेल्या प्रमाणपत्रासहित विद्यापीठास सादर केल्या शिवाय महाविद्यालये/संस्था यांचे मार्फत येणारे परिक्षा अर्ज (Exam Form), नोंदणी अर्ज (Enrollment Form), महाविद्यालयांची संलग्नता (Continuation /Extension), प्राचार्य व शिक्षक मान्यता (Approval), जाहिरात—मसूदा व बिंदुनामावली इ. गोष्टी तपासली जाणार नाहीत.**

**त्याचप्रमाणे संबंधित सर्वेक्षणाच्या कामकाजाबाबत एखादया कोणत्याही महाविद्यालय/संस्था यांनी आपली संबंधित Online स्वरूपातील माहिती ची नोंद न केल्यास त्यांची नावे काळया यादीत (Black List) दाखविण्यात येवून विद्यापीठ Website वर Highlight करून दर्शविण्यात यावेत, असे आदेश संचालक, महाराष्ट्र शासन, उच्च शिक्षण विभाग, पुणे, यांनी दिलेले आहेत, याची कृपया नोंद घ्यावी.**

Scanned by CamScanner

# University of Mumbai

—२—

सर्वेक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून Online स्वरूपातील माहिती विवरण पत्रामध्ये भरण्याबाबत आपणास काही समस्या/अडचणी उद्‌भवल्यास खालील दिलेल्या रकान्यातील ठिकाणानूसार संर्पक साधावा व त्याचप्रमाणे तत्संबंधित माहिती Online पद्धतीने विहित विवरण पत्रामध्ये महत्वाची बाब विचारात घेता माहिती तात्काळ भरून पाठवावी, जेणेकरूण महाराष्ट्र शासन व संचालनालय यांना ती योग्य व अचूक स्वरूपात प्राप्त होईल.

याकरीता सर्व संबंधित महाविद्यालये व संस्था यांनी ती त्वरित Upload करावीत व त्याबाबतचे हमीपत्र/प्रमाणपत्र भरून मुंबई विद्यापीठ, सांख्यिकी कक्ष, फोर्ट, यांच्याकडून ना–हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) घ्यावे.

| Contact Person | Office | Land Line No. | E-mail ID |
|---|---|---|---|
| MIS Call Centre, Pune | Director of Higher Education, Government of Maharashtra, Pune. | 020 - 6500 1173<br>020 - 6500 1016 | stat.dhepune@nic.in |
| Nodal Officer (AISHE/MIS Cell) | University of Mumbai, Statistical Unit, Room No. 202, Fort, Mumbai- 400 032. | 022 - 2270 8738<br>022 - 2261 8987 | supt.statunit@gmail.com |

**टिप्पणी :– MIS बाबतची माहिती फक्त कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र व विधी आभ्यासक्रम असलेल्या महाविद्यालयांनी भरणे अनिवार्य आहे. (वास्तूशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन व औषधशास्त्र आभ्यासक्रम वगळता). तसेच सदरची ऑनलाईन माहिती दिनांक १५ नोव्हेंबर, २०१६ पर्यंत भरणे अनिवार्य आहे.**

3/10/16

मुंबई–४०० ०३२
दिनांक : ०१ ऑक्टोबर, २०१६

डॉ. एम. ए. खान
कुलसचिव

RM 1.10.16

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाही करीता रवाना:–

१. संचालक, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण,मध्यवर्ती इमारत पुणे–४११ ००१.
२. परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ(पूर्व),मुंबई–४०० ०९८.
३. उपकुलसचिव, संलग्नता विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई– ४०००३२.
४. उपकुलसचिव, घटक महाविद्यालये, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई– ४०००३२.
५. उपकुलसचिव, पदवुत्तर विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई– ४०००३२.
६. उपकुलसचिव, विशेष कक्ष, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई– ४०००३२.
७. उपकुलसचिव, नाव नोंदणी विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),मुंबई–४०० ०९८.
८. अधिक्षक, आवक विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई– ४०००३२.
९. अधिक्षक, आवक विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),मुंबई–४०० ०९८.

**यांना असे कळविण्यात येते की, MIS बाबतची माहिती विद्यापीठ विभाग व संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांनी भरणे अनिर्वाय असून सदर माहिती न भरल्यास त्या विभागाचे/महाविद्यालये/संस्थेच्या विद्यार्थ्यांचे परिक्षा अर्ज (Exam.Form) व नोंदणी अर्ज (Enrollment Form)महाविद्यालयाची संलग्नता (Continuation/Extension) /प्राचार्य/शिक्षक मान्यता (Approval) व महाविदयालये/संस्थांचे कोणतेही पत्रव्यवहार स्विकारू नयेत तसेच जाहिरात, मसुदा, बिदुंनामावली तपासणी करू नये असे आदेश मा. संचालक, संचालनालय, उच्च शिक्षण विभाग, पुणे,व मा. कुलगुरू, मुबंई विद्यापीठ यांनी दिलेला असून त्याप्रमाणे प्रत्येक विद्यापीठ विभाग/संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थेकडून त्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधितांकडून घेण्यात यावे.**

3/10/16

(डॉ. एम. ए. खान)
कुलसचिव

RM 1.10.16

Scanned by CamScanner